**दिनांक 21/12/2017 कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीची टिपणी**
**मा. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली, विभागीय आयुक्त,कोकण विभाग, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई यांचे कार्यालय.**

**१.मागिल बैठकीचा आढावा.**

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय</th><th>झालेली चर्चा व घेण्यात आलेला निर्णय</th><th>कार्यवाही करणारी यंत्रणा</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>I</td><td>कोकण वेटलँड तक्रार निवारण नवीन वेबसाईडला सुरुवात करणे.</td><td>कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची Website (konkanwetland.com) ही वेटलँन्ड शी संबंधित तक्रारींची नोंद होणयाकरिता सुरुवात केली आहे.</td><td>सदस्य सचिव</td><td>पुर्तता झाली आहे विषय वगळण्यात यावा.</td></tr>
<tr><td>II</td><td>टोल फ्री क्र. 1926 या सेवेचा लाभ घेणे.</td><td>अ) Ex. Director, Mangrove and Marine Biodiversity conservation foundation यांनी सदर वर्षात 1926 Hello Forest सेवा चालू करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. पुढील वर्षासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून ते Add.C.S (Environment) ला पत्र लिहीणार आहे.<br>ब) समितीने Nodal officer ची नेमणूक प्रत्येक जिल्हयामधून 2 Nodal Officer (एक महसूल व एक वन विभाग) ची माहिती देण्यास जिल्हा प्रशासनाला सांगितले तसेच त्यासाठी समितीला आवश्यक असणारी माहिती पुढील स्वरुपात प्राप्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br><table><tr><th>नोडल अधिकाऱ्याचे नाव</th><th>पद</th><th>दुरध्वनी क्रमांक</th><th>ई.मेल ID</th></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr></table></td><td>सर्व जिल्हाधिकारी</td><td>अहवाल अपेक्षित आहे.</td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| III | जुन्या तक्रारींचा आढावा<br>a) श्री. विनोद पुन्शी व इतर<br>b) श्रीमती श्रुती अगरवाल<br>c) श्रीमती मनी अय्यर<br>d) श्रीमती रश्मी चौधरी<br>e) श्रीमती कांचन पुरोहीत (Complaint Regarding Destruction of Wetland behind NRI complex in sector 60 Nerul, New Mumbai) | मौजे नेरुळ सेक्टर 60 मधील पाणथळावर होत असलेल्या अतिक्रमणासंदर्भात प्राप्त तक्रार अर्ज तक्रार निवारण समितीच्या दि.30/10/2017 रोजीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला. सदर तक्रारी अर्जावर एका तक्रारदाराच्या उपस्थितीत सभेमध्ये चर्चा करण्यात आली. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.4 ऑक्टोबर 2017 रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे Space Application center अहमदाबाद यांनी निश्चित केलेल्या यादीतील वेटलॅन्ड चे संरक्षण करण्याचे सूचना केलेल्या आहेत. मौजे नेरुळ सेक्टर 60 मधील पाणथळ हे वर नमूद यादीतील एक वेटलॅन्ड असल्याने तात्काळ सीडकोला तेथील काम थांबविण्याबाबत आदेश देण्यात आले तसेच सदरचा तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीकरिता संबंधीत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. | जिल्हाधिकारी, ठाणे | अहवाल अपेक्षित आहे. |
| IV | श्री. स्टॅलिन डी (Complaint Regarding) Destruction of Wetland Goregaon, east Mumbai.) | श्री. स्टॅलिन डी यांनी गोरेगाव, पुर्व येथील वॉटर बॉडी / पाणथळावर होणाऱ्या अतिक्रमाणासंदर्भात तक्रार अर्ज माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर केलेला आहे. सदर तक्रार अर्जामध्ये तक्रारदाराने सदर क्षेत्र हे खाजगी क्षेत्र असून मालमत्ता पत्रकावर रॉयल पंप्स म्हणून धारकाची नोंद असल्याबाबत नमूद केलेले आहे. सदरील तक्रार खाजगी क्षेत्राशी संबंधीत असल्याने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात आलेला आहे तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना पुढील बैठकीमध्ये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याची विनंती केलेली आहे. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर | अहवाल अपेक्षित आहे. |
| V | श्री. रोहित जोशी :- (स्वामी समर्थ मार्ग,कोपरी ठाणे पुर्व) | या तक्रारी संदर्भात डेब्रिज काढण्यासाठी आयुक्त ठाणे महानगरपालिका यांनी या संदर्भात बैठक आयोजित करण्याचे सांगितले होते, त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनिधीने पुढील बैठकीमध्ये अंतरिम अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना समितीने दिल्या आहेत. | ठाणे महानगरपालिका | अंतरिम अहवाल अपेक्षीत आहे. (Interim Report) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| VI | श्री. फ्रान्सिस डिसोजा:- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220):- | श्री. फ्रान्सिस डिसोझा यांच्या तक्रारी संदर्भात तहसिलदार,वसई यांनी या बैठकीमध्ये अहवालानुसार दिवाणी न्यायालयास स्थगिती उठविण्यासाठी दि.12/06/2017 रोजी विनंती केलेली आहे व त्याची पुढील सुनावणी दि. 09/11/2017 अशी आहे. उर्वरित अतिक्रमण हटविण्यासाठी संबंधित सर्वांना उपविभागीय अधिकारी, वसई यांनी नोटीस निर्गमीत केली आहे असे समितीला सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर | अहवाल प्राप्त आहे. |
| VII | श्री. अनंत दत्तात्रय पाटील :- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220) | श्री. अनंत दत्तात्रय पाटील यांच्या तक्रारी संदर्भात तहसिलदार,वसई यांनी या बैठकीमध्ये अहवालानुसार दिवाणी न्यायालयास स्थगिती उठविण्यासाठी दि.12/06/2017 रोजी विनंती केलेली आहे व त्याची पुढील सुनावणी दि. 09/11/2017 अशी आहे. उर्वरित अतिक्रमण हटविण्यासाठी संबंधित सर्वांना उपविभागीय अधिकारी, वसई यांनी नोटीस निर्गमीत केली आहे असे समितीला सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर | अहवाल प्राप्त आहे. |
| VIII | New Link Road Residence Forum, Dahisar West :- | समितीने या संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना लवकरात लवकर अंतरिम अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. | अंतरिम अहवाल अपेक्षीत आहे. (Interim Report) |
| IX | धीरज परब:-<br>ईमेलद्वारा प्राप्त अर्ज<br>1) भाईंदर पश्चिम प्रभाग समिती क्र. 1, मुर्धा खाडी व परिसरात सर्रास कांदळवन, सीआरझेड व पाणथळ जागेवरील अतिक्रमण व बांधकामाबाबत.<br>2)जैसल पार्क चौपाटी, सुभाषचंद्र बोस मैदान आदी अन्य ठिकाणी पर्यावरणाचा ऱ्हास केल्याबाबत. | उपआयुक्त मीरा-भाईंदार महानगरपालिका यांनी बेकायदेशीरपणे होणारे अतिक्रमण हटविण्यासाठी वेळ देण्यास सांगितले होते, त्यानुसार समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना एक महिन्याची मुदत अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार<br>अ) आयुक्त मिरा-भाईंदर महानगर पालिकेच्या दि.4/12/2017 रोजीच्या अहवालानुसार घोडबंदर येथील अनधिकृत बांधकाम हटविण्यात आले आहे.<br>(श्री. राकेश घरत यांचे ग्रीन ॲटोमोबाईल सेंटरचे बांधकाम, ओमकार ॲटोमोबाईल यांचे पत्राशेडचे बांधकाम, लोखंडी कंटेनरमधील 8 रुमचे | आयुक्त,मिरा-भाईंदर महानगरपालिका. | अतिक्रमण हटविल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 3) मुंबई सुरत महामार्ग व वसई खाडी किनारा तसेच महामार्ग वरील नायगाव खाडी किनारा परिसरात कांदळवनाची तोड करुन बेकायदा भराव व जागेवर अतिक्रमण व बांधकामाबाबत.<br>4) मिरा-भाईंदर येथील जाफरी खाडी पात्र व कांदळवन परिसरात बेकायदा भराव, सीआरझेड व पाणथळ जागेवरील अतिक्रमण व बांधकामाबाबत. | बांधकाम ही सर्व अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली आहेत.)<br>ब) तसचे आयुक्त मिरा-भाईंदर महानगर पालिकेच्या दि.19/12/2017 रोजीच्या अहवालानुसार भाईंदर पुर्व प्रभाग समिती क्र. 3 या परिसरातील अनधिकृत अतिक्रमण हटविण्यात आले आहे.<br>(भाईंदर, पूर्व नवघर चाळ, नवघर चाळघर, नवघर स्मशानभुमी या क्षेत्रातील अतिक्रमण हटविण्यात आले आहे.)<br>क) दि. 19/12/2017 च्या अहवालानुसार अवर लेडी ऑफ नाझरेत चर्च मागील लालबहादूर शास्त्री नगर व नेहरु नगर लगत सॉल्ट डिपार्टमेंटच्या मालकी जागेवरील अतिक्रमण हटविण्यात आले आहे. | | |
| X | श्री. नंदकुमार पवार:- (बाळकुम, कशेरी, काल्हेर, अंजूर दिवा) | या तक्रारी संदर्भात अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी सद्यस्थितीची पहाणी करुन FIR दाखल केली असून निवासी जिल्हा अधिकारी, ठाणे सांगितले. त्यानुसार समितीने त्यांचा अंतरिम अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे, | अंतरिम अहवाल अपेक्षीत आहे.<br>(Interim Report) |
| XI | श्री. ॲल्विन विन्सॅट रॉड्रीग्ज :-<br>(मौजे बोळींज , स.न. 390 ता. वसई जि. पालघर) | विषयांकीत तक्रारीच्या अनुषंगाने मागील बैठकीत चर्चा करण्यात आलेली होती. सदरचा तक्रार अर्ज हा भात शेतीचे प्लॉट होणारे अतिक्रमण संदर्भातील होता. वेटलॅन्ड नियमानुसार वेटलॅन्ड व्याख्या भातशेती क्षेत्राचा समावेश नाही. त्यामुळे सदरचा तक्रार अर्ज निकाली काढण्यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्याबाबत विचार करित असताना श्री.स्टॅलिन यांनी सदरचे क्षेत्र भातशेतीचे जरी असले तरी पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत महत्वाचे असून SAC ने निश्चित केलेल्या वेटलॅन्डच्या यादीतील आहे किंवा नाही, याची शहानिशा करण्याबाबत विनंती केली. समितीने त्यांची विनंती मान्य करुन संबंधित तहसिलदार यांना जागेचे GPS रिडींग घेऊन सदरचे क्षेत्र NWIA या यादितील वेटलॅन्ड मध्ये येते किंवा कसे ? यांची शहानिशा करणेबाबत आदेश दिले. त्यानुसार संबंधित तहसिलदार यांना सभेमध्ये अहवाल सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | जिल्हाधिकारी पालघर. | अहवाल अपेक्षीत आहे. |